महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पीआर-३/अभय योजना/३१८३१** **दिनांक :२०.१०.२०१४.**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २३२

**विषय :-** विशेष अभय योजनेला (स्पेशल ॲमनेस्टी स्कीम) मुदतवाढ करुन देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० दिनांक २ मे, २०१३.
२) शासन निर्णय क्र. एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१३/उद्योग-१० दिनांक १.८.२०१३.
३) शासन निर्णय क्र. एसआयसी २०१३/प्र.क्र.५१/१२/उद्योग-१० दिनांक १४.०८.२०१२.
४) वाणिज्य परिपत्रक क्र :२११ दि.१.१०.२०१३.

-----------

"महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३" नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी वरील संदर्भीय शासन निर्णय क्र. १ व २ नुसार राज्य शासनाने विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme) अंमलात आणलेली होती. सदर योजना एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी बंद असलेल्या व पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या उद्योगांसाठी लागू होती. शासन निर्णय दि.०२ मे, २०१३ नुसार या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या घटकाने राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ केले जाईल. सदर योजना ही शासनाची सर्व प्रकारची देणी म्हणजेच विक्रीकर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मुळ रक्कम, व्याज व दंडव्याज इत्यादी सह जी रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी समजण्यात यावी.

विशेष अभय योजनेला (स्पेशल ॲमनेस्टी स्कीम) राबविण्यासाठी महावितरण कंपनीतर्फे वाणिज्य परिपत्रक क्र:२११ दि.१.१०.२०१३ नुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या होत्या. सदर योजना दि.३१.३.२०१४ पर्यंत लागू होती.

महाराष्ट्र शासनाने वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ नुसार विशेष अभय योजनेला दि.३१.३.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढ देताना शासनाने मुळ शासन निर्णय दि.२.५.२०१३ व १.८.२०१३ मधील अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

**१) या योजनेचा लाभ खालील निकष पुर्ण करणा-या उद्योग घटकांना देण्यात येईल.**

अ) एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी बंद असलेला किंवा न्यायालयाकडून नादार / दिवाळखोर (insolvent) म्हणून घोषित झालेला उद्योग घटक.

ब) रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूत्रानुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेला उद्योग घटक.

क) उद्योग घटक हस्तांतरणामुळे घटकाच्या व्यवस्थापनात बदल होऊन घटक पुढे यशस्वीरित्या चालू राहिल.

**२) वरील प्रमाणे विशेष अभय योजनेचा लाभ देताना क्षेत्रिय कार्यालयांनी खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे :-**

१. घटक बंद / पुनरुज्जीवनक्ष्म नसल्याबाबत संबंधित वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केलेल्या आजारी उद्योगाच्या व्याख्येनुसार घटक आजारी असल्याबाबत सनदी लेखापालांचे प्रमाणपत्र घेण्यात येईल.

२. घटक बंद पडले असल्याबाबतची खात्री करताना, त्या घटकाची संबंधित कालावधीतील विद्युत देयके, पाण्याची देयके, विज/पाणी पुरवठा खंडीत केल्याबाबतची कागदपत्रे, उत्पादन बंद पडल्याच्या आर्थिक वर्षापासूनचे वार्षिक ताळेबंद यापैकी कोणताही पुरावा ग्राहय धरण्यात येईल व त्यासोबत उद्योग घटकाने घटक बंद पडल्याच्या दिनांकासंबंधी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. घटकास विशेष अभय योजनेचा लाभ देण्यात आल्यानंतर पूर्वीच्या व्यवस्थापनामध्ये बदल अपेक्षित आहे. यामध्ये-

(अ) कंपनी असेल तर त्याच्या भाग भांडवलातील नियंत्रक हितसंबंधामध्ये (कंट्रोलिंग इन्टरेस्ट) बदल.

(ब) भागीदारी संस्था असेल तर जुन्या भागीदार/ भागीदारांकडे नियंत्रक हितसंबंधांएवढी भागीदारी नसावी.

४. ज्या पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या/ बंद उद्योग घटकांबाबत न्यायालय/ प्राधिकरणाकडे दावे प्रलंबित आहेत, अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेचा लाभ देण्याबाबत संबंधित विभागाने निर्णय घ्यायचा आहे.

५. १ एप्रिल, २०१० व त्यानंतर बंद पडून नवीन व्यवस्थापनाकडे हस्तांतरीत झालेले घटक जर सदर शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता करीत असतील तर अशा बंद घटकाने महावितरणची मूळ थकित रक्कम एक रकमी भरल्यास अशा बंद घटकाला विशेष अभय योजनेचा लाभ देण्यात येईल व १०० टक्के व्याज व १०० टक्के विलंब आकाराची रक्कम माफ करण्यात येईल.

६. १ एप्रिल, २०१० पूर्वी बंद पडलेले व हस्तांतरीत झालेले परंतू उत्पादनात न गेलेल्या घटकावर शासनाच्या कोणत्याही विभागाकडून वसूलीची कार्यवाही सुरु असेल, अशा घटकांनी महावितरणची थकबाकीची मूळ रक्कम एकरकमी भरणा केल्यास त्यांना विशेष अभय योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल व १०० टक्के व्याज व १०० टक्के विलंब आकाराची रक्कम माफ करण्यात येईल.

७. सामुहिक प्रोत्साहन योजना १९७९ किंवा त्यापूर्वीच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार उद्योग घटकांनी प्रत्यक्षात उपभोगलेले शासन अनुदान/ प्रोत्साहनाच्या रक्कमेबाबतची माहिती त्या उद्योग घटकाकडे/ अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित कार्यालयाकडे आढळून येत नाही अशा परिस्थितीत घटकास दिलेल्या पात्रता प्रमाणपत्रात मंजूर केलेल्या भांडवली गुंतवणूकीच्या १००% विक्रीकर उपभोगले आहे असे समजून त्या घटकाला विषेश अभय योजनेचा लाभ देण्यात यावा . तसेच ज्यांच्या बाबतीत पात्रता प्रमाणपत्र इ. कागदपत्रे आढळून येत नाहीत अशा प्रकरणी त्या घटकाने आतापर्यंत उपभोगलेली प्रोत्साहने / अनुदान हे एकूण मंजूर अनुदान म्हणून विचारात घेऊन विशेष अभय योजनेचा लाभ देण्यात यावा. (उदा. सा.प्रा.यो. नुसार विक्रीकर प्रोत्साहने, विशेष भांडवली अनुदान इ.)

८. नवीन व्यवस्थापनाने त्याचठिकाणी तीन वर्षाच्या आत उत्पादन घटक सुरु करणे अपेक्षित आहे. तसेच सदर उद्योग घटक भविष्यात उत्तमरित्या चालू राहील, या दृष्टीकोनातून त्या उद्योजकास उत्पादनात बदल करण्याची मुभा असेल. त्याठिकाणी सेवा उद्योग (उदा. आयटी / बीटी/ थिम पार्क इ.) देखील सुरु करता येईल. ज्या योगे त्या जागेचा योग्य वापर होऊन रोजगार निर्मिती व गुंतवणूक शक्य होईल.

९. जे उद्योग घटक SARFAESI Act, DRT,High Court Liquidator यांचे आदेशान्वये कोणत्याही बोझ्याशिवाय (Encumbrances) हस्तांतरीत झालेली असतील, तर अशा घटकांकडून सा. प्रो. यो. अंतर्गत असलेली थकबाकी वसूल करता येऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे, त्या घटकाचे ठिकाणी नवीना / विस्तारीत कारणा अंतर्गत येणारा घटक सा.प्रो. यो. अंतर्गत प्रचलित धोरणानुसार प्रोत्साहने मिळण्यास पात्र होऊ शकेल.

१०. विशेष अभय योजोबाबतची अंमलबजावणी विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालाालय यांच्यामार्फत करण्यात येईल. विशेष अभय योजना मंजूर केल्यानंतर संबंधित ठिकाणी घटक सुरु झाला किंवा नाही याचे संनियंत्रण उद्योग संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने करावयाचे आहे.

११. विशेष अभय योजनेअंतर्गत विविध विभागांनी ज्या उद्योग घटकांना लाभ दिला त्याबाबतची माहिती, लाभ / सूट दिलेली रक्कम याबाबतची माहिती त्या विभागाने उद्योग संचालनायल किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडे द्यावी.

१२. विशेष अभय योजनेचा लाभ घेतलेल्या नवीन व्यवस्थापनाने त्यांना विशेष अभय योजना मंजूर झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत त्या ठिकाणी उत्पादन सुरु करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अभय योजने अंतर्गत मंजूर केलेले लाभ (माफ करण्यात आलेला व्याज व विलंब आकार) द.सा.द.शे. १२ % व्याजासह वसूली करण्यात येईल. सदर वसूली संदर्भात उद्योग संचालनायाने विहित केलेल्या नमुन्यानुसार त्रिपक्षी करार करण्यात येईल तो त्या घटकाचा पूर्वीचा मालक व नवीन मालक या दोघांवर बंधनकारक असेल. सदर वसूली ज्या लाभाच्या संदर्भातील असेल त्या संबंधित विभागाने / विभागाने प्राधिकृत केलेल्या कार्यालयाने करावयाची आहे. त्याबाबतची माहिती संबंधित विभाग / प्राधिकृत कार्यालयाने उद्योग संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडे सादर करावी.

१३. शासनाच्या विशेष अभय योजनेच्या उद्दिष्टानुसार पात्र लघुदाब व उच्चदाब औद्योगिक ग्राहकांने संपूर्ण मुळ थकबाकी एक रकमी भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच १०० % व्याज व १०० % विलंब आकाराची रक्कम माफ करण्यात येईल. याकरीता शेवटचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आलेल्या तारखेची मुळ थकबाकीची रक्कम (वीज वापर नसलेल्या कालावधीतील रक्कम सोडून) ग्राहय धरण्यात यावी. परंतु वसुलीकरीता न्यायालयात दावा प्रलंबित असल्यास, मुळ थकबाकीसह संपूर्ण न्यायालयीन खर्च वसुल करण्यात यावा.

१४. सदर योजना राबविण्याचे / मंजूरीचे अधिकार संबंधित विभाग प्रमुख किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना देण्यात येत असून योजनेचा लाभ घेण्यासाठी उद्योग घटकाने संबंधित विभाग प्रमुख किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांचेकडे विहित कालावधीत अर्ज करणे आवश्यक राहिल.

१५. या योजने अंतर्गत माफ करण्यात आलेली व्याज व दंडाची रक्कम सन २०१४-१५ च्या बुडीत कर्जातून निर्लेखित करण्यात यावी.

१६. ज्या प्रकरणामधे कोर्टाचा हुकुमनामा (Decree) प्राप्त झाली असल्यास परंतु १२ वर्षापर्यंत प्रत्यक्ष अंमलात आलेली नसल्यास अशी प्रकरणे विशेष अभय योजने करीता ग्राहय धरण्यात यावी.

१७. नविन जोडणी, आवश्यक असल्यास, नियमानुसार देण्यात यावी.

१८. सदर योजना महावितरणला तसेच महावितरणच्या सर्व फ्रॅन्चायसी कंपन्यांना लागू राहिल.

१९. सदर योजना निम शासकीय संस्था, शासकीय कंपन्या व महामंडळे यांच्याकडील थकीत देण्यासाठी देखील लागू राहिल. सदर योजनेस  दिनांक ३१.३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२०. विशेष अभय योजना (स्पेशल ॲमनेस्टी स्कीम) चा कालावधी ३१.३.२०१५ पर्यंत राहिल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे**